| | |
|---|---|
| | फौ. कि. अर्ज क्र. ५४/२०२६<br>संकेत –वि– शासन<br>एम.एच.वाय.ए.क्र. १३–०००६२२–२०२६ |

निशाणी क्रमांक ०१ वर आदेश

[**दि. १०/०६/२०२६ रोजी** पारित]

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार नामे– संकेत काळू उर्फ काडू जाधव यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ५०३ अन्वये जप्त मुद्देमालाचा अंतरिम ताबा मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. त्यामध्ये अर्जदार यांनी असे नमूद केले आहे की, त्यांची इलेक्ट्रीक डेमो प्रोडक्ट मशीन, रंग निळा ही गुन्हा रजिष्टर क्रमांक ३९८/२०२६, कलम २२३,२७४,२७५ बि.एन.एस २०२३ व अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम कलम २६,२७,३० तसेच सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने अधिनियम कलम ७, २४ अंतर्गत पोलीस स्टेशन, दिग्रस मध्ये जप्त करण्यात आले आहे. सदरील ईलेक्ट्रीक मशीनची अर्जदारास दैनंदिन कामकाजा करीता नेहमी गरज पडते व अर्जदारास त्याची अत्यंत आवश्यकता आहे. म्हणून प्रस्तुत ईलेक्ट्रीक मशीनचा अंतरिम ताबा मिळण्यासाठी अर्जदार यांनी प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे.

२) प्रस्तुत अर्जास विद्वान सहायक सरकारी अभियोक्ता यांनी म्हणने दाखल करुण सदर ईलेक्ट्रीक मशीन ही खरा बनवण्याची असुन त्यापासुन केवळ खराच तयार करण्यात येतो. तसेच जर सदर मशीन अर्जदारास दिल्यास तो परत त्यापासुन अवैद्य पदार्थ तयार करु शकतो. त्यामुळे सदर मशीन ही अर्जदारस देण्यास त्यांचा विरोध असल्याचे तसेच अर्जदारास सदर जप्त मुद्देमाल परत देऊ नये अशी विनंती केली. तसेच तपास अधिकारी यांनी त्यांचे म्हणणे नि. क्र. ०६ अन्वये दाखल करुन, त्यामध्ये त्यांनी गुन्हा रजिष्टर क्रमांक ३९८/२०२६, मध्ये सदर ईलेक्ट्रीक मशीन ही खरा घोटण्याची मशीन असुन जर सदर जप्त मुद्देमाल अर्जदारास परत

दिल्यास तो यापुढे सुध्दा त्याच्या पान टपरीत ईलेक्ट्रीक मशीनचा वापर करुण खरा विक्री करु शकतो. त्यामुळे न्यायालयाने योग्य तो आदेश होण्याची विनंती केली आहे.

३) प्रस्तुतचा अर्ज, त्यावरील लेखी खुलासा व अभिलेखावरील दस्तऐवजांचे अवलोकन केले. तसेच अर्जदाराच्या विद्वान वकीलांनी असा युक्तीवाद केला की, अर्जदार हा सदर जप्त ईलेक्ट्रीक मशीनचा उपयोग हळदीचे खांड फोडण्याकरीता करीत असुन त्याला दैनंदिन वापरा करीता सदर जप्त मुद्देमालाची अत्यंत आवश्यकता आहे. तसेच सरकारी विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, सदर जप्त मुद्देमाल ईलेक्ट्रीक मशीन ह्याचा उपयोग केवळ खरा बनवण्याकरीता केला जात असुन सदर मुद्देमाल अर्जदारास दिल्यास यापुढे देखील तो अश्या प्रकारचे पदार्थ तयार करुण विकण्याची शकयता नाकरता येत नाही.

४) प्रस्तुत अर्जाच्या समर्थनार्थ अर्जदार यांनी निशाणी क्रमांक ३ च्या दस्त यादीसोबत अभिलेखावर अर्जदाराच्या आधार ओळखपत्राची पडताळीत प्रत व जप्त ईलेक्ट्रीक मशीनच्या पडताळीत बिलाची प्रत व एफ.आय.आर ची प्रत दाखल केली. अभिलेखावरील दाखल दस्तावरुण जप्त मुद्देमाल हा अर्जदार नामे– संकेत काळू जाधव यांच्या मालकिचा असल्याचे प्रथमदर्शी दिसुन येते.

५) परंतु असे असले तरी अभिलेखावरील अर्जदाराचा अर्ज पाहता अर्जदाराने असे कुठेही नमुद केले नाही की, त्याला जप्त मशीनचा उपयोग खरा तयार करण्याकरीता करायचा नसुन ईतर कामा करीता उपयुक्त आहे. तसेच जप्त मुद्देमाल हा बि.एन.एस २०२३ चे कलम २२३,२७४,२७५ व अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम कलम २६,२७,३० तसेच सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने अधिनियम कलम ७, २४ अंतर्गत जप्त केला असल्याकारणाने अर्जदाराला जप्त मुद्देमालाचा उपयोग खरा बनवण्या व्यतिरिक्त हळदीचे खांड फोडण्याकरीता किंवा ईतर कामा करीता करीत असल्याचे अभिलेखावरील कागदोपत्री पुराव्या वरुण प्रथमदर्शणी सिध्द होत नाही.

६) अभिलेखावरील जप्त मुद्देमाल हस्तातंरणाबाबत सहायक सरकारी अभियोक्ता तसेच तपासी अम्मलदार यांनी त्यांचा विरोध दर्शविलेला आहे. त्यामुळे गुन्ह्याचे स्वरुप व जप्त मुद्देमालाचा पुराव्याच्या दृष्टीने महत्व या सर्व बाबींचा विचार केला असता, जप्त मुद्देमालाचा अंतरिम ताबा अर्जदारास दिल्यानंतर तो प्रतिबंधीत तंबाखुजन्य पदार्थ तयार करण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे जप्त मुद्देमालाचा अंतरिम ताबा अर्जदारास हस्तांतरीत करणे माझ्यामते योग्य होणार नाही. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**// आ दे श //**

प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

SAKHARE MANISHA BALAJI

Digitally signed by SAKHARE MANISHA BALAJI
Date: 2026.06.10 17:46:59 +0530

ठिकाण :– दिग्रस
दिनांक :– १०/०६/२०२६

**(म. बा. साखरे)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्रमांक–२, दिग्रस.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file are same as per original.

| | |
|---|---|
| Name of Stenographer | S.B. Chilkewar |
| Name of the Court | Smt. M. B. Sakhare<br>J.M.F.C. (Court No. 2), Digras. |
| Date of decision | 10.06.2026 |
| Order Signed by P.O. on | 10.06.2026 |
| Order uploaded on | 10.06.2026 |